Adda247

# Decoding

# MPSC CIVIL SERVICES

## PRELIMS EXAM 2024

## MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024



**समाविष्ट**

- विहंगावलोकन
- महत्त्वाच्या तारखा
- रिक्त पदे
- पात्रता निकष
- परीक्षेचे स्वरूप
- अभ्यासक्रम
- वेतनश्रेणी
- अर्ज शुल्क
- मागील वर्षाच्या प्रश्नपत्रिका (उत्तर तालिका सहित)

# Decoding MPSC Civil Services Prelims Exam 2024

## MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 विहंगावलोकन

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि. 08 मे 2024 रोजी MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 सुधारित अधिसुचना जाहीर केली आहे. उमेदवार या लेखात MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 अधिसुचना चा सर्व तपशील तपासू शकतात.

| **MPSC** राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा **2024** अधिसुचना: विहंगावलोकन | |
|---|---|
| श्रेणी | सरकारी नोकरी |
| आयोगाचे नाव | महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) |
| पदाचे नाव | गट अ व ब मधील विविध पदे |
| अर्ज प्रक्रिया | ऑनलाईन |
| एकूण पदे | 524 |
| लेखाचे नाव | MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 अधिसुचना |
| अर्ज सुरु होण्याची तारीख | 09 मे 2024 |
| अर्ज करण्याची शेवटची तारीख | 24 मे 2024 |

## MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 महत्त्वाच्या तारखा

MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 अधिसुचना साठी ऑनलाईन अर्ज 09 मे 2024 पासून सुरु होणार आहे. MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 अधिसुचना संबधी सर्व महत्वाच्या तारखा तुम्ही खालील तक्त्यात पाहू शकता.

| **MPSC** राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा **2024** अधिसुचना: महत्वाच्या तारखा | |
|---|---|
| कार्यक्रम | तारीख |
| MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 सुधारित अधिसुचना | 08 मे 2024 |
| MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 ऑनलाईन अर्ज सुरु होण्याची तारीख | 09 मे 2024 |
| MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख | 24 मे 2024 |
| MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 तारीख | 06 जुलै 2024 |
| राज्य सेवा मुख्य परीक्षा तारीख 2024 | 14 ते 16 डिसेंबर 2024 |
| महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा 2024 | 23 नोव्हेंबर 2024 |
| महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा 2024 | 28 ते 31 डिसेंबर 2024 |

# MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 रिक्त पदे

MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 रिक्त जागेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **संवर्ग** | **रिक्त पदे** |
|---|---|
| राज्यसेवा | 431 |
| महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा | 45 |
| महाराष्ट्र वनसेवा | 48 |
| एकूण | **524** |

पदानुसार तपशीलवार रिक्त जागांचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **रिक्त पदे** |
|---|---|---|
| | **राज्यसेवा** (431 **पदे**) | |
| 1. | गट विकास अधिकारी | 52 |
| 2. | साहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा | 43 |
| 3. | सहायक आयुक्त/ प्रकल्प अधिकारी | 03 |
| 4. | उद्योग उप संचालक | 07 |
| 5. | सहायक कामगार आयुक्त | 02 |
| 6. | मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी | 19 |
| 7. | सहायक गट विकास अधिकारी | 25 |
| 8. | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क | 01 |
| 9. | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक अधिकारी | 07 |
| 10. | सरकारी कामगार अधिकारी | 04 |
| 11. | सहायक प्रकल्प अधिकारी/ सांख्यिकी अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी | 04 |
| 12. | निरीक्षण अधिकारी (पुरवठा) | 76 |
| 13. | उप जिल्हाधिकारी | 07 |
| 14. | सहाय्यक राज्यकर आयुक्त | 116 |
| 15. | सहायक आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता | 01 |
| 16. | उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | 05 |
| 17. | उद्योग अधिकारी (तांत्रिक) | 07 |
| 18. | सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) | 52 |
| | महाराष्ट्र वनसेवा (**43** पदे) | |
| 1. | सहायक वनसंरक्षक | 32 |
| 2. | वन क्षेत्रपाल | 16 |
| | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (**26** पदे) | |
| 1. | उपविभागीय जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) | 23 |
| 2. | जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) | 22 |

# MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 पात्रता निकष

MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 साठी फॉर्म भरण्याआधी आपणास सर्व पदांसाठी आवश्यक पात्रता निकष तपासणे गरजेचे आहे. ज्यात शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा यांचा समावेश होतो. MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 पात्रता निकष खालीलप्रमाणे आहे.

## नागरिकत्व

- उमेदवार भारताचा नागरिक असावा.

मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

## वयोमर्यादा

MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024साठी प्रवर्गानुसार वयोमर्यादा खालीलप्रमाणे आहे.

- वयोमर्यादा गणण्याचा दिनांक-
    - निरीक्षण अधिकारी/परिमंडळ अधिकारी, गट-ब वगळता इतर सर्व संवर्गासाठी - दिनांक 1 एप्रिल, 2024
    - निरीक्षण अधिकारी/परिमंडळ अधिकारी, गट-ब - दिनांक 25 जानेवारी, 2024
- खुला प्रवर्ग - 18 ते 38 वर्षे
- मागास प्रवर्ग - 19 ते 43 वर्षे
- खेळाडू - 19 ते 43 वर्षे
- दिव्यांग - 19 ते 45 वर्षे
- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सनिव 2023/प्र.क्र.14/कार्या-12, दिनांक 03 मार्च, 2023 अनुसार कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देण्यात येत आहे.

## शैक्षणिक अर्हता

| पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
| --- | --- |
| सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट अ | • सांविधिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा<br>• इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकांऊटस ऑफ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा<br>• इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा<br>• सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युतर पदवी, किंवा<br>• अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए). |
| उद्योग उप संचालक, तांत्रिक, गट अ | • सांविधिक विद्यापीठाची अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील पदवी किंवा<br>• विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी. |
| सहायक वनसंरक्षक | • खालील विषयांपैकी कमीत कमी एका विषयाची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी :-<br>(1) वनस्पतीशास्त्र (2) रसायनशास्त्र (3) वनशास्त्र (4) भूशास्त्र (5) गणित (6) भौतिकशास्त्र (7) सांख्यिकी (8) प्राणिशास्त्र (9) उद्यानविद्या (10) पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र किंवा<br>• कृषि, अभियांत्रिकी यातील स्नातक पदवीधर |

| पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| वनक्षेत्रपाल | • वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषिशास्त्र, कृषि अभियांत्रिकी, रसायन अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विदयुत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, संगणक अप्लिकेशन, संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशुवैद्यकीय विज्ञान यांपैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी किंवा<br>• विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक. (तीन) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक उमेदवाराने विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>• शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक एफएसटी-02/15/प्र.क्र.46/फ-4, दिनांक 11 फेब्रुवारी, 2016 नुसार इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी तसेच संगणक विज्ञान व तंत्रज्ञान अभियांत्रिकी अशी अर्हता धारण करणारे उमेदवार वनक्षेत्रपाल पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.<br>• शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक: एफएसटी-09/18/प्र.क्र.366/फ-4, दिनांक 8 सप्टेंबर, 2021 अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार खालील विद्याशाखेतील पदवीधर उमेदवार पदवीमध्ये गणित विषय घेवून उत्तीर्ण झाले असल्यास व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान शाखेत असल्यास वनक्षेत्रपाल संवर्ग/पदासाठी पात्र असतील :- (1) BE/B.Tech. Automobile Engineering, (2) BE/B.Tech. Power, (3) BE/B.Tech. Production, (4) BE/B.Tech. Metallurgy and Material, (5) BE/B.Tech. Textile, (6) BE- Information Technology, (7) BE-Instrumentation, (8) B.Sc.- Biotechnology, (9) B. Pharmacy, (10) B.Tech. Food Science |
| स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने त्या पदवीशी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता.<br>• शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकिर्ण-2013/ (45/13)/भाग-1/तांशि-2, दिनांक 18 ऑक्टोबर, 2016 नुसार खालील शैक्षणिक अर्हता स्थापत्य अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत:-<br>○ B.E./B. Tech. (Civil and Water Management)<br>○ B.E. / B. Tech. (Civil and Environmental)<br>○ B.E./ B. Tech. (Structural)<br>○ B.E./B.Tech. (Construction Engineering/Technology) |

## शारीरिक अर्हता

| पदाचे नाव | पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|---|
| 1.सहायक वनसंरक्षक, गट अ<br><br>2.वनक्षेत्रपाल, गट ब | अनुसूचित जमाती व्यतिरिक्त अन्य उमेदवार | |
| | उंची- 163 सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) छाती- न फुगवता 79 सें.मी. (कमीत कमी) फुगविण्याची क्षमता- न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक 5 सें.मी. पेक्षा कमी नसावा. | उंची - 150 सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

| पदाचे नाव | पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|---|
| | अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार | |
| | उंची - 152.5 सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br><br>छाती - न फुगवता 79 सें.मी. (कमीत कमी) फुगविण्याची क्षमता- न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक 5 सें.मी. पेक्षा कमी नसावा. | उंची - 145 सें.मी. पेक्षा कमी नसावी |
| | दृष्टी :- सुधारणेनंतर (After Correction) + 4.00 OD सह प्रत्येक डोळयाची दृष्टितीक्ष्णता (Visual Acuity) 6/6 असावी. बाह्य डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा. | |
| | सहायक वनसंरक्षक, गट-अ करीता पुरुष व महिला उमेदवारांची अनुक्रमे 25 कि.मी. व 14 कि.मी. अंतर चार तासांत चालून पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता असणे आवश्यक.<br><br>वनक्षेत्रपाल, गट-ब पुरुष व महिला उमेदवारांची अनुक्रमे 25 कि.मी. व 16 कि.मी. अंतर चार तासांत चालून पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता असणे आवश्यक. | |

## MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 परीक्षेचे स्वरूप

MPSC राजपत्रित सेवा पूर्व परीक्षेमध्ये 400 गुणांसाठी 100 प्रश्न विचारले जातात. प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश (1/4) मार्क कमी होतात. पेपर 1 (GS) मध्ये इतिहास, भूगोल, पर्यावरण, राजशास्त्र, अर्थशात्र, सामान्य विज्ञान, चालू घडामोडी, गणित आणि बुद्धिमत्ता हे विषय आहेत तर पेपर 2 मध्ये (CSAT) हा आहार्ताकारी (Qualifying in Nature) आहे. MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 साठी परीक्षेचे स्वरूप खालील तक्त्यात दिले आहे.

| अ.क्र. | संवर्ग | टप्पे | संयुक्त पूर्व परीक्षेचे गुण | मुख्य परीक्षेचे गुण | मुलाखतीचे गुण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | राज्यसेवा | संयुक्त पूर्व परीक्षा व स्वतंत्र मुख्य परीक्षा | 400 | 800 | 100 |
| 2. | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा | | | 400 | 50 |
| 3. | महाराष्ट्र वनसेवा | | | 400 | 50 |

## MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 अभ्यासक्रम

MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 साठी पेपर 1 आणि पेपर 2 चा अभ्यासक्रम खाली सविस्तर पणे दिला आहे.

### पेपर 1 चा अभ्यासक्रम

MPSC राजपत्रित सेवा परीक्षेमधील मधील पेपर 1 चा अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 1 | राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या चालू घडामोडी. |
| 2 | भारताचा इतिहास व भारतीय राष्ट्रीय चळवळ. महाराष्ट्राच्या भारांशासह. |
| 3 | महाराष्ट्र, भारत व जगाचा भूगोल- महाराष्ट्राचा, भारताचा व जगाचा प्राकृतिक, सामाजिक, आर्थिक भूगोल. |

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 4 | भारत आणि महाराष्ट्र- राज्यशास्त्र व प्रशासन संविधान, राजकीय प्रणाली, पंचायती राज, नगर प्रशासन, सार्वजनिक धोरण, हक्क विषयक प्रश्न इत्यादी. |
| 5 | आर्थिक व सामाजिक विकास शाश्वत विकास, दारिद्रय, समावेशन, लोकशाही, सामाजिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादी. |
| 6 | पर्यावरण पारिस्थितीकी, जैव विविधता आणि हवामान बदल यांवरील सर्वसाधारण प्रश्न- याला विषय विशेषज्ञांची गरज नाही. |
| 7 | सामान्य विज्ञान |

## पेपर 2 चा अभ्यासक्रम

MPSC राजपत्रित सेवा पूर्व परीक्षेमधील पेपर 2 चा अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 1 | आकलन |
| 2 | संवाद कौशल्यांसह आंतर व्यक्तिगत कौशल्य. |
| 3 | तर्कशुद्ध तर्क आणि विश्लेषणात्मक क्षमता |
| 4 | निर्णय क्षमता आणि समस्या निराकरण . |
| 5 | सर्वसाधारण मानसिक क्षमता |
| 6 | मूळ संख्याता (अंक आणि त्यांचे संबंध, परिमानाचा क्रम इत्यादी) (इयत्ता दहावी स्तरावरील), विदा अनुयोजन ( तक्ता, आलेख, कोष्टक, विदा पर्याप्तता इत्यादी - इयत्ता दहावी स्तरावरील) |
| 7 | मराठी आणि इंग्रजी भाषा आकलन कौशल्य (इयत्ता दहावी/बारावी स्तरावरील) |

## MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 वेतनश्रेणी

MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 साठी पदानुसार वेतनश्रेणी खालील तक्त्यात दिली आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतन श्रेणी |
|---|---|---|
| **राज्यसेवा** (205 **पदे**) | | |
| 1. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ गट विकास अधिकारी | S-20 56100 - 177500 |
| 2. | साहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा | S-20 56100 - 177500 |
| 3. | सहायक आयुक्त/ प्रकल्प अधिकारी | S-20 56100 - 177500 |
| 4. | उद्योग उप संचालक | S-20 56100 - 177500 |
| 5. | सहायक कामगार आयुक्त | S-18 49100 - 155800 |
| 6. | मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी | S-17 47600 - 151100 |
| 7. | सहायक गट विकास अधिकारी | S-15 41800 - 132300 |
| 8. | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क | S-15 41800 - 132300 |
| 9. | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक अधिकारी | S-15 41800 - 132300 |
| 10. | सरकारी कामगार अधिकारी | S-15 41800 - 132300 |
| 11. | सहायक प्रकल्प अधिकारी/ सांख्यिकी अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी | S-15 41800 - 132300 |
| 12. | निरीक्षण अधिकारी (पुरवठा) | S-14 38600 - 122800 |
| 13. | उप जिल्हाधिकारी | S-20 56100 - 177500 |
| 14. | सहाय्यक राज्यकर आयुक्त | S-20 56100 - 177500 |

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतन श्रेणी |
|---|---|---|
| 15. | सहायक आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता | S-18 49100 - 155800 |
| 16. | उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | S-15 41800 - 132300 |
| 17. | उद्योग अधिकारी (तांत्रिक) | S-15 41800 - 132300 |
| 18. | सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) | S-15 41800 - 132300 |
| **महाराष्ट्र वनसेवा (43 पदे)** | | |
| 1. | सहायक वनसंरक्षक | S-20 56100 - 177500 |
| 2. | वन क्षेत्रपाल | S-16 44900 - 142400 |
| **महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (26 पदे)** | | |
| 1. | उपविभागीय जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) | S-18 49100 - 155800 |
| 2. | जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) | S-15 41800 - 132300 |

## MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 अर्ज शुल्क

MPSC राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 साठी आवश्यक अर्ज शुल्क प्रवर्गानुसार खाली देण्यात आले आहे.

- अराखीव (खुला): 544/- रुपये
- मागासवर्गीय, आर्थिक दुर्बल घटक, अनाथ व दिव्यांग: 344/- रुपये
- उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बँक शुल्क तसेच त्यावरील देयकर अतिरिक्त असतील.
- परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.










Adda247 मराठी

# 2023

संच क्र. **A**

## प्रश्नपुस्तिका
## पेपर – I

**Q17**

प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. 281277

**एकूण प्रश्न : 100**
**एकूण गुण : 200**

**वेळ : 2 (दोन) तास**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.




(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर–क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न–क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

1. पंडीता रमाबाईनी रमाबाई असोसिएशनच्या अनुमतीने आपल्याला सल्ला देण्यासाठी एक सल्लागार मंडळ नेमले. त्यात खालीलपैकी कोणाचा समावेश होता ?

   i. न्यायमूर्ती म. गो. रानडे

   ii. डॉ. आर. जी. भांडारकर

   iii. न्यायमूर्ती के. टी. तेलंग

   iv. बापू हरी शिंदे

   (1) केवळ i व ii
   (2) केवळ ii व iii
   (3) केवळ i व iv
   (4) केवळ i, ii व iii

   Pandita Ramabai with the permission of the Ramabai Association, appointed an advisory board to advise her, who among the following was included in this advisory board ?

   i. Justice M. G. Ranade

   ii. Dr. R. G. Bhandarkar

   iii. Justice K. T. Telang

   iv. Bapu Hari Shinde

   (1) i and ii only
   (2) ii and iii only
   (3) i and iv only
   (4) i, ii and iii only

2. इ. स. 1918, साली मुंबईतील कामगारांना 'पिपल्स युनियन' ही संघटना स्थापना करण्याचा उपदेश कोणी केला होता ?

   (1) राजश्री शाहु महाराज
   (2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
   (3) नारायण मेघाजी लोखंडे
   (4) भाई माधवराव बागल

   In 1918 A. D., who advised to the Mumbai workers to establish the organization 'People's Union' ?

   (1) Rajashree Shahu Maharaj
   (2) Dr. Babasaheb Ambedkar
   (3) Narayan Meghaji Lokhande
   (4) Bhai Madhavrao Bagal



Adda247 मराठी

**3.** ब्राह्मणेतर पत्रकारितेची मुहुर्तमेढ रोवून चिपळूणकरांच्या महात्मा ज्योतिराव फुलेंवरील हल्याचा बचाव आपल्या वृत्तपत्राद्वारे कोणी केला ?

(1) नारायण मेघाजी लोखंडे (2) भाऊ दाजी लाड
(3) तुकाराम तात्या पडवळ (4) कृष्णाजी भालेकर

Who defended Chiplunkar's attack on Mahatma Jyotirao Phule through his newspaper, considered as the beginning of non Brahmin journalism ?

(1) Narayan Meghaji Lokhande (2) Bhau Daji Lad
(3) Tukaram Tatya Padval (4) Krushnaji Bhalekar

---

**4.** 'मालविकाग्निमित्र' या प्राचीन नाटकात कोणत्या दोन राजघराण्याच्या वैवाहिक संबंधावर प्रकाश पडतो ?

(1) शुंग आणि विदर्भ (यज्ञसेन) घराणे
(2) गुप्त आणि वाकाटक घराणे
(3) शक आणि सातवाहन घराणे
(4) चालुक्य आणि वर्धन घराणे

On which of the following matrimonial relationship between two Royal families, the ancient drama 'Malavikagnimitra' throws light ?

(1) Shunga and Vidarbha (Yadnyasen) family
(2) Gupta and Vakataka family
(3) Shakas and Satavahana family
(4) Chalukya and Vardhana family

---

**5.** वैदीक काळात व्यापारात विनिमयाचे माध्यम काय होते ?

i. निष्क
ii. कृष्णाल
iii. शतमान
iv. गण
v. श्रेणी

(1) i, ii व iii (2) ii, iii व iv (3) i, ii, iv व v (4) i, iii व v

What was the medium of trade exchange during vedic period ?

i. Nishka
ii. Krusnal
iii. Shatman
iv. Gan
v. Shreni

(1) i, ii and iii (2) ii, iii and iv (3) i, ii, iv and v (4) i, iii and v

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**



Adda247 मराठी

6. सेतु माधवराव पगडी यांच्या मते, नाथ पंथातील कोणत्या संताने 'शहा रमजान' हे नाव धारण करून सुफी संत निजामुद्दिन यांच्या कडून इस्लाम धर्माची दिक्षा घेतली. हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एक गूढ आहे.

(1) गोरखनाथ
(2) गहिनीनाथ
(3) जालन्धरनाथ
(4) कानिफनाथ

According to Setu Madhavrao Pagadi, who of the following saint renamed himself as 'Shaha Ramjan' and got converted to Islam by a Sufi Saint Nizamuddin. It is a mystery of cultural history of Maharashtra.

(1) Gorakhnath
(2) Gahininath
(3) Jalandharnath
(4) Kanifnath

---

7. खालील घटनांची योग्य क्रमाने मांडणी करा.

i. श्वेत पत्रिका
ii. पुणे करार
iii. नेहरू अहवाल
iv. धारासना सत्याग्रह

(1) iv, ii, iii, i    (2) iv, i, ii, iii
(3) iii, iv, ii, i    (4) ii, iii, iv, i

Arrange the following events in the correct order.

i. White paper
ii. Poona pact
iii. Nehru report
iv. Dharasna Satyagraha

(1) iv, ii, iii, i    (2) iv, i, ii, iii
(3) iii, iv, ii, i    (4) ii, iii, iv, i



Adda247 मराठी

8. पुढील वाक्ये ________ यांच्या विषयी आहेत.

अ. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात त्यानी महत्त्वाची भूमिका बजावली.

ब. त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर पाठ्यपुस्तके तयार केली.

क. गणित आणि शास्त्रावर त्यांनी 'शून्यलब्धी' हे पुस्तक मराठीतून लिहीले.

ड. केशवराव भवाळकरानी त्यांचे चरित्र लिहीले आहे.

(1) दादोबा पांडूरंग तरखडकर

(2) आत्माराम पांडूरंग तरखडकर

(3) बाळशास्त्री जांभेकर

(4) गोपाळ हरि देशमुख

The following statements are written about

a. He played an important role in the field of education in Maharashtra.

b. He prepared textbooks on various subjects.

c. He wrote a book 'Shunyalabdhi' on Mathematics and Science in Marathi.

d. Keshavrao Bhavalkar has written his biography.

(1) Dadoba Pandurang Tarkhadkar

(2) Atmaram Pandurang Tarkhadkar

(3) Balshastri Jambhekar

(4) Gopal Hari Deshmukh

---

9. पुढील राजकीय संघटनांचा कालानुक्रमे योग्य क्रम लावा.

अ. पुणे सार्वजनिक सभा

ब. बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन

क. मद्रास महाजन सभा

ड. इंडियन असोसिएशन

(1) ब अ ड क

(2) अ ड क ब

(3) क ड ब अ

(4) ड ब अ क

Arrange the following political organizations chronologically.

a. Pune Sarvajanik Sabha

b. Bombay Presidency Association

c. Madras Mahajan Sabha

d. Indian Association

(1) b a d c

(2) a d c b

(3) c d b a

(4) d b a c



Adda247 मराठी

**10.** खालीलपैकी कोणता निर्णय साबरमती कराराने घेण्यात आला ?

(1) प्रतियोगी सहकारिता पक्षाची स्थापना करावी.

(2) विद्यार्थ्यांना राजकारणात सहभागी करून घेऊ नये.

(3) कनिष्ठ जातीय कामगारामध्ये भेदाभेद करू नये, तसेच 50 स्वयंसेवकाचे पथक उभारावे व हिंदु मुस्लिम ऐक्य राखावे.

(4) मोतीलाल नेहरू आणि जयकर यांच्या समितीने मध्यवर्ती विधिमंडळाचे सदस्य निश्चित करावे.

Which of the following decision was taken by Sabarmati treaty ?

(1) A competitive co-operative party should be established.

(2) Students should not be involved in politics.

(3) There should be no discrimination among lower caste workers and a team of 50 volunteers should be formed and Hindu Muslim unity should be maintained.

(4) A committee of Motilal Nehru and Jayakar to determine the members of the Central Legislature.

---

**11.** इ. स. 1934 मध्ये 'कर्षक संघम' एक शेतकरी संघटना म्हणून खालीलपैकी कोणत्या प्रांतात स्थापन करण्यात आली ?

(1) आंध्रप्रदेश (2) तामिळनाडु

(3) केरळ (4) बंगाल

In 1934 A. D., which of the following region, witnessed the establishment of 'Karshak Sangham' as a peasant organisation ?

(1) Andhra Pradesh (2) Tamil Nadu

(3) Kerala (4) Bengal

---

**12.** दांडीयात्रेचा उल्लेख ''रामाचा लंकेवरील ऐतिहासिक मोर्चा'' असे कोणी केला ?

(1) पंडित मोतीलाल नेहरू आणि डी. जी. तेंडूलकर

(2) पी. सी. रे आणि डी. पी. मिश्रा

(3) शंकरराव देव आणि ग. वि. केतकर

(4) अप्पासाहेब पटवर्धन आणि सुहासिनी नंबीयार

Who remarked about the 'Dandi Yatra' as, Rama's Historical March to Lanka ?

(1) Pandit Motilal Nehru and D. J. Tendulkar

(2) P. C. Ray and D. P. Mishra

(3) Shankarrao Dev and G. V. Ketkar

(4) Appasaheb Patwardhan and Suhasini Nambiyar

---



Adda247 मराठी

**13.** खालील विधाने कोणासंदर्भात आहेत ?

i. धर्माची राजकारणापासून फारकत घेतली.

ii. सती जाणाऱ्या शूर स्त्रीयांच्याबाबत अलिप्ततेचे धोरण स्वीकारले.

iii. बालविवाह थांबविणे व विधवा विवाहाला उत्तेजन दिले.

iv. सामाजिक कायद्याबाबत अंतिम निर्णय आपला असल्याचा दावा केला.

(1) बाबर (2) हुमायुन

(3) अकबर (4) औरंगजेब

About whom the following statements are related ?

i. Religion was separated from politics.

ii. Adopted a policy of seclusion towards brave women who followed Sati.

iii. To stop child marriage and widow marriage was encouraged.

iv. Claimed that the final decision regarding the social law will be his.

(1) Babur (2) Humayun

(3) Akbar (4) Aurangzeb

---

**14.** खानदेशातील भिल्लांनी ब्रिटिश राजवटीस विरोध केला होता कारण

i. उत्तर भारतातील उठावाच्या घटनांपासून सातपुडा विभागातील भिल्लांना प्रेरणा मिळाली.

ii. 1857 च्या उठावाचा फायदा घेवून भागोजी नाईक व काझिसिंग नाईक उठावात सामिल झाले.

iii. काझिसिंग व त्यांच्या सहकाऱ्यांनी सरकारी खजिना व पोस्ट जाळले.

(1) i व ii (2) ii व iii

(3) i व iii (4) वरीलपैकी सर्व

Bhills in Khandesh protested against British rule because

i. The Bhills of the Satpura division got inspiration from the event of the uprising in North India.

ii. Taking advantage of the revolt of 1857 Bhagoji Naik and Kazising Naik joined the revolt.

iii. Kazising and his associates burnt government treasuries and post offices.

(1) i and ii (2) ii and iii

(3) i and iii (4) All of the above

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

15. खालीलपैकी कोणत्या वृत्तपत्रातून ॲनी-बेझंट यांनी होमरूल चळवळी बद्दलचे विचार मांडले ?

अ. न्यू इंडिया

ब. कॉमन वील

क. बॉम्बे गॅझेट

ड. टेलीग्राफ

(1) अ आणि ब फक्त

(2) ब आणि क फक्त

(3) अ आणि ड फक्त

(4) अ, ब आणि क फक्त

In which of the following newspapers did Annie-Besant present her thoughts about Home Rule Movement ?

a. New India

b. Common Weal

c. Bombay Gazette

d. Telegraph

(1) a and b only

(2) b and c only

(3) a and d only

(4) a, b and c only

---

16. खालील विधाने पहा :

अ. घातक कचरा मृदेमध्ये टाकल्यामुळे जैवविविधता कमी होते.

ब. नद्यामधे वारंवार पूर येण्यामागे वृक्षतोड कारणीभूत आहे.

क. फ्रांसिस्को मेंडझ यांच्या उर्जा क्षेत्रातील कार्यामुळे त्यांना 'अमेझॉन गांधी' म्हणून संबोधतात.

(1) फक्त विधान क बरोबर आहे

(2) फक्त विधान अ बरोबर आहे

(3) फक्त विधान अ आणि ब बरोबर आहेत

(4) विधान अ, ब आणि क बरोबर आहेत

Observe the following statements :

A. There is loss of bio-diversity due to dumping of toxic waste into soil.

B. Deforestation is responsible for frequent floods in river.

C. Fransisco Mendez was known as 'Amazon Gandhi' due to his work in energy field.

(1) Only statement C is correct

(2) Only statement A is correct

(3) Only statement A and B are correct

(4) Statement A, B and C are correct



Adda247 मराठी

17. मातीतील नायट्रोजन खत जिवाणूद्वारे तोडल्यास _______ मुक्त होते.

(1) नायट्रोजन डायऑक्साइड ($NO_2$)

(2) नायट्रस ऑक्साइड ($N_2O$)

(3) नायट्रोजन ट्रायऑक्साइड ($NO_3$)

(4) नायट्रोजन ($N_2$)

Nitrogen fertilizers in soils releases _______ when broken down by bacteria.

(1) Nitrogen dioxide ($NO_2$)

(2) Nitrous oxide ($N_2O$)

(3) Nitrogen trioxide ($NO_3$)

(4) Nitrogen ($N_2$)

---

18. ओझोन संदर्भात खालील कोणती विधाने बरोबर आहेत ?

अ. ओझोनला पृथ्वीचे रक्षण कवच म्हणतात.

ब. 1985 मध्ये ओझोन थराला छिद्र पडल्याचे स्पष्ट झाले.

क. 16 सप्टेंबर हा जागतिक ओझोन दिवस म्हणून साजरा केला जातो.

ड. 1989 मध्ये ओझोन क्षयास कारणीभूत रसायन वापरावर बंदी घालण्यात आली.

(1) फक्त अ, ब आणि क

(2) फक्त ब, क आणि ड

(3) फक्त अ, क आणि ड

(4) वरील सर्व

In relation to Ozone which statements are true ?

A. Ozone is called protection shield of the Earth.

B. In 1985 it was clear that Ozone layer has holes.

C. $16^{th}$ September is celebrated as World Ozone Day.

D. In 1989 chemicals responsible for Ozone depletion are banned to utilize.

(1) Only A, B and C

(2) Only B, C and D

(3) Only A, C and D

(4) All the above



Adda247 मराठी

**19.** खालीलपैकी कोणता परिस्थितिकी मनोऱ्याचा प्रकार नाही ?

(1) संख्येचा मनोरा (2) जैविक वस्तुमानाचा मनोरा

(3) अन्नजाळी मनोरा (4) उर्जेचा मनोरा

Which of the following is not the type of Ecological pyramid ?

(1) Pyramid of number (2) Pyramid of biomass

(3) Pyramid of food web (4) Pyramid of energy

---

**20.** काही प्रजाती नष्ट झाल्या तर पर्यावरणावर गंभीर परिणाम करतात त्यांना ________ म्हणतात.

(1) निळा दगड (2) लाल दगड

(3) पिवळा दगड (4) किस्टोन

Some species if eliminated seriously affect the ecosystem. These are called

(1) Blue stone (2) Red stone

(3) Yellow stone (4) Keystone

---

**21.** खालील आकृतीचे निरीक्षण करून खालीलपैकी कोणत्या मूळाक्षरांनी चंद्राचा तीन चतुर्थांश भाग प्रकाशित दर्शविला आहे हे नमूद करा ?

(1) B आणि H (2) C आणि G (3) D आणि F (4) E आणि A

Observe the following diagram and state which of the following alphabets indicate the gibbous phase of the moon ?

(1) B and H (2) C and G (3) D and F (4) E and A



22. ''पर्यावरण म्हणजे सजीवांच्या किंवा जीवसमूहांच्या जीवन, वाढ, विकास व मृत्युवर परिणाम करणारी सर्व परिस्थिती, तिची कारकें व त्यांचा प्रभाव होय''.

पर्यावरणाची ही व्याख्या कोणी केली ?

(1) विश्वकोष
(2) ब्रिटानिका विश्वकोष
(3) ए. सी. टान्सले
(4) जॅकी स्मिथ

"Environment means the sum total of all conditions agencies and influences which affect the development, growth, life and death of an organism, species or race".

Who created this definition of environment ?

(1) Universal Encyclopedia
(2) Britanica Encyclopedia
(3) A. C. Tansley
(4) Jackie Smith

---

23. पश्चिम राजस्थानाच्या प्रदेशात चुनखडक, जिप्सम आणि खनिज मीठाचे साठे वितरीत झालेले आहेत. खालीलपैकी कोणती कारणे या खनिजांच्या साठ्यांच्या वितरणास कारणीभूत आहेत ?

a. पर्मोकार्बोनिफेरस युगात पश्चिम राजस्थानचा भाग समुद्राच्या पाण्याखाली होता.
b. पश्चिम राजस्थानाच्या प्रदेशात पर्जन्याचे प्रमाण कमी आहे.
c. पश्चिम राजस्थानाच्या प्रदेशात हवामान उष्ण व कोरडे आहे.
d. पश्चिम राजस्थानाच्या प्रदेशात वनाच्छादाना खालील क्षेत्र अत्यल्प आहे.

(1) फक्त a बरोबर आहे
(2) फक्त a आणि b बरोबर आहेत
(3) a, b आणि c बरोबर आहेत
(4) फक्त d बरोबर आहे

In the western part of Rajasthan minerals like limestone, gypsum and mineral salts reserves are distributed.

Which of the following reasons are responsible for this occurrence ?

a. Western part of Rajasthan was submerged under sea water during permocarboniferous period.
b. Western part of Rajasthan receives low rainfall.
c. Western part of Rajasthan has hot and dry climate.
d. In the western part of Rajasthan the area under vegetation is very low.

(1) only a is correct
(2) only a and b are correct
(3) a, b and c are correct
(4) only d is correct

24. खालीलपैकी कोणत्या मृदेत लोह व बॉक्साइट खनिजाचे प्रमाण अधिक असते ?

(1) तांबडी मृदा (2) रेगूर मृदा
(3) जांभी मृदा (4) गाळाची मृदा

Which of the following soil contain the maximum proportion of iron and bauxite minerals ?

(1) Red soil (2) Regur soil
(3) Laterite soil (4) Alluvial soil

---

25. खाली दोन विधाने दिली आहेत त्यापैकी (A) हे प्रतिपादन असून (R) हे त्याचे कारण आहे. दिलेल्या पर्यायातून बरोबर उत्तर निवडा.

(A) कापूस हा वजन न घटणारा शुद्ध कच्चा माल आहे, शिवाय हलका व टिकावू आहे.

(R) सुती कापड उद्योगाचे स्थानिकीकरण कापूस उत्पादक प्रदेश किंवा बाजारपेठ या ठिकाणी होते.

(1) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे खरे स्पष्टीकरण आहे
(2) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे खरे स्पष्टीकरण नाही
(3) (A) हे बरोबर आहे पण (R) हे चूक आहे
(4) (A) हे चूक आहे पण (R) हे बरोबर आहे

Given below are two statements one labeled as Assertion (A) and other labeled as Reason (R). Select correct answer from the options given below.

(A) Cotton is not a weight lossing pure raw material, besides is light in weight and durable.

(R) The localization of the cotton textile is found either in cotton producing region or near market.

(1) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)
(2) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)
(3) (A) is true but (R) is false
(4) (A) is false but (R) is true

**26.** भारताच्या प्राकृतिक नकाशात महाराष्ट्र पठार खालीलपैकी कोणत्या रंगाने दर्शविले आहे ?

(1) गडद हिरवा (2) हिरवा (3) पिवळा (4) तपकिरी

In the physical map of India, Maharashtra plateau is shown by which of the following colours ?

(1) Dark green (2) Green (3) Yellow (4) Brown

---

**27.** खालीलपैकी कोणत्या दिवशी दक्षिण गोलार्धातील उन्हाळी अयनदिन येतो ?

(1) 21 मार्च (2) 21 जून

(3) 23 सप्टेंबर (4) 22 डिसेंबर

On which of the following day does the summer solstice occurs in the southern hemisphere ?

(1) 21 March (2) 21 June

(3) 23 September (4) 22 December

---

**28.** भूमध्य सामुद्रीक प्रदेशात हिवाळ्यात पाऊस पडण्याचे कारण

(1) वायुभार पट्ट्यांचे आंदोलन

(2) वायुभार पट्ट्यांच्या आंदोलनामुळे हिवाळ्यात भूमध्य समुद्राच्या प्रदेशात कमी वायुभार प्रदेश निर्माण होतो

(3) भूमध्य समुद्राकडून भूभागाकडे वारे वाहतात

(4) आल्प्स पर्वताच्या वात सन्मुख उतारावर प्रतिरोध पर्जन्य पडतो

Winter rainfall received by the Mediterranean region is the result of

(1) Shifting of pressure belts

(2) Low pressure belt occurs over the Mediterranean region during the winter season due to shifting of pressure belts

(3) Winds blow from the Mediterranean sea towards land

(4) Orographic rain developed on the windward slope of the Alps

---



Adda247 मराठी

29. पश्चिम पॅसिफिक महासागराच्या किनारवर्ती भागात प्रामुख्याने सागरीगर्ता आढळतात कारण

(1) पॅसिफिक महासागराच्या पश्चिमेकडील किनारवर्ती भाग अधोगमन क्षेत्राचा आहे

(2) पॅसिफिक महासागराच्या पश्चिम किनारी भागाला समांतर पर्वतरांगा पसरल्या आहेत

(3) पॅसिफिक महासागराच्या पश्चिमेकडील भागात खंडान्त उतार तीव्र आहे

(4) पॅसिफिक महासागराच्या पश्चिमी भागात सागरीगर्ता मोठ्या प्रमाणावर आढळतात

Trenches are found mainly along the coast of the western Pacific Ocean because

(1) The western margin of the Pacific Ocean is the sub-duction zone

(2) Along the western border of the Pacific Ocean parallel mountain ranges are aligned

(3) The continental slope of the western part of the Pacific Ocean is steep

(4) The western part of the Pacific Ocean is characterised by a large number of trenches

---

30. 'मान्सूनची माघार' हा भारतीय हवामानाचा आविष्कार खालीलपैकी कोणत्या वातावरणीय परिस्थितीचा परिणाम आहे ?

(1) नैर्ऋत्य मान्सून वारे हिमालय पर्वतरांगांपर्यंत पोहचल्यानंतर ते तेथून माघारी फिरतात

(2) सूर्याचे भासमान भ्रमण

(3) भारताच्या वायव्य भागाकडून आग्नेय भागाकडे उच्च वायुभार पट्ट्याचा होणारा विस्तार

(4) भारतीय उपखंडात निर्माण होणारी वायुभारातील भिन्नता

The climatic phenomena retreating monsoon is the result of which of the following atmospheric condition in India ?

(1) After reaching to the Himalayan ranges the south-west monsoons retreats

(2) The apparent movement of the Sun

(3) The expansion of the high pressure belt from north-western part to south-eastern part of India

(4) The occurrence of variability in the atmospheric pressure developed over the Indian sub-continent



Adda247 मराठी

31. खालीलपैकी कोणते/कोणती विधान/ने बरोबर आहेत ?

महाराष्ट्रात उत्तरेकडून क्रमाने पठारावरील प्रमुख डोंगररांगा व त्यांच्या दक्षिणेकडील नद्यांची खोरी खालीलप्रमाणे आहेत :

अ. सातपुडा पर्वत रांगेच्या दक्षिणेकडे तापी-पूर्णा खोरे.

ब. सातमाळा अजिंठा डोंगराच्या दक्षिणेस गोदावरी नदीचे खोरे.

क. हरीश्चंद्र बालाघाट डोंगर व त्याच्या दक्षिणेस भिमा नदीचे खोरे.

ड. शंभू महादेवाचे डोंगर व त्याच्या दक्षिणेस कृष्णा नदीचे खोरे.

(1) फक्त अ

(2) वरील सर्व बरोबर

(3) फक्त अ व ब

(4) फक्त अ व क

Which of the following is/are correct statements ?

In Maharashtra, in order from north, the major hill ranges on the plateau and the river basins to their south are as follows :

a. Tapi Purna basin to the south of the Satpura mountain range.

b. Godavari river valley to the south of Satmala Ajintha hills.

c. Harishchandra Balaghat hill and Bhima river basin to its south.

d. Shambhu Mahadeva hills and Krishna river basin to its south.

(1) Only a

(2) All are correct

(3) Only a and b

(4) Only a and c



Adda247 मराठी

32. सह्याद्रीची रांग सरळ रेषेत नसून अनेक ठिकाणी ती वक्राकार झालेली आहे कारण

(1) सह्याद्रीतून उगम पावणाऱ्या कोंकणातील नद्यांनी उगमापाशी केलेल्या शीर्षवर्ती खननामुळे ती वक्राकार झालेली आहे

(2) सह्याद्रीतून उगम पावणाऱ्या कोंकणातील नद्यांच्या पार्श्ववर्ती खननामुळे ती वक्राकार झालेली आहे

(3) सह्याद्रीतून उगम पावणाऱ्या कोंकणातील नद्यांच्या तळाच्या खननामुळे ती वक्राकार झालेली आहे

(4) सह्याद्रीत पडणाऱ्या मुसळधार पर्जन्यामुळे सह्याद्रीची झीज होऊन ती वक्राकार झालेली आहे

The Sahyadri range is not straight but at many places it is curved, because

(1) The Sahyadri range is curved at many places because of the headward erosion of the Konkan rivers originating in Sahyadri

(2) The Sahyadri range is curved at many places because of the lateral erosion of the Konkan rivers originating in Sahyadri

(3) The Sahyadri range is curved at many places because of the downward erosion of the Konkan rivers originating in Sahyadri

(4) Due to heavy rainfall the Sahyadri range is heavily eroded and hence it is curved

---

33. गोदावरी व कृष्णा नद्यांच्या तुलनेने कावेरी नदीच्या पात्रात हिवाळ्यात पाण्याचे प्रमाण वाढते, कारण

(1) नैऋत्य मान्सून वाऱ्यांमुळे कावेरी नदीच्या पात्रात पर्जन्यवृष्टी मोठ्या प्रमाणावर होते

(2) ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळे कावेरी नदीच्या पात्रात पर्जन्यवृष्टी मोठ्या प्रमाणावर होते

(3) कावेरी नदीच्या पात्रात ईशान्य व नैऋत्य मान्सून वाऱ्यांपासून पर्जन्यवृष्टी होते

(4) कावेरी नदीच्या उपनद्या कावेरी नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा पुरवठा करतात

As compared to the Godavari and Krishna rivers, the course of the Kaveri river receives large volume of water during winter, because

(1) The course of the river Kaveri receives heavy rainfall from the south-west monsoons

(2) The course of the river Kaveri receives heavy rainfall from the north-east monsoons

(3) The course of the river Kaveri receives rainfall from both south-west and north-east monsoons

(4) The tributaries of the Kaveri provide large volume of water to the course of the Kaveri

---



Adda247 मराठी

34. उद्योगाच्या स्थान निश्चिती करताना अल्फ्रेड वेबर यांनी खालीलपैकी कोणत्या घटकाचे महत्त्व आपल्या सिद्धांतात सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे ?

(1) उद्योगाच्या स्थान निश्चितीकरणात मजूरांवरील मूल्या चे योगदान महत्त्वाचे असते
(2) उद्योगाच्या स्थान निश्चितीकरणात कच्च्या मालावरील खर्चाचे योगदान महत्त्वाचे असते
(3) उद्योगाच्या स्थान निश्चितीकरणात बाजारपेठेची सुगमता महत्त्वाची असते
(4) उद्योगाच्या स्थान निश्चितीकरणात वाहतूक खर्चाचे योगदान महत्त्वाचे असते

In his theory of industrial location Alfred Weber tried to establish the pivotal role of which of the following factors ?

(1) Labour cost plays a pivotal role in the selection of industrial location
(2) Cost of raw material plays a pivotal role in the selection of industrial location
(3) Market accessibility plays a pivotal role in the selection of industrial location
(4) Transport cost plays a pivotal role in the selection of industrial location

---

35. खालील विधानांचा विचार करून त्यातील कोणते/कोणती विधान/ने बरोबर आहे/आहेत ते संकेतांकाचा वापर करून उत्तर लिहा.

1. केंद्रित वस्ती बहुधा शेतवाड्यांनी वेढलेली असते.
2. हिमालयीन प्रदेशात केंद्रित वस्त्या आढळत नाहीत.

(1) फक्त 1 बरोबर आहे
(2) फक्त 2 बरोबर आहे
(3) दोन्ही 1 आणि 2 बरोबर आहेत
(4) 1 ही बरोबर नाही व 2 ही बरोबर नाही

Consider the following statements and select the correct answer using the code given below.

1. A compact settlement is most probably surrounded by hamlets.
2. Compact settlements are not found in the Himalayan region.

(1) Only 1 is correct
(2) Only 2 is correct
(3) Both 1 and 2 are correct
(4) Neither 1 nor 2 is correct



Adda247 मराठी

36. ______________ ह्या पदार्थाचा प्रतिरोधकता निर्णायक (critical) तापमानाच्या खाली शून्य होते.

(1) वाहक
(2) रोधक
(3) अतिवाहक
(4) यापैकी नाही

____________ are materials whose resistivities become zero below a critical temperature.

(1) Conductors
(2) Insulators
(3) Super conductors
(4) None of these

---

37. जर एखादी वस्तू 36° अंशात तिरप्या असणाऱ्या दोन समतल आरशांमध्ये समरूप ठेवली, तर किती प्रतिमा तयार होतील ?

(1) 8
(2) 9
(3) 10
(4) 11

If an object is placed symmetrically between two plane mirrors inclined at an angle of 36°, then how many images will be formed ?

(1) 8
(2) 9
(3) 10
(4) 11

---

38. $\frac{p}{\rho} + hg + \frac{1}{2} =$ स्थिरांक, हे गणितीय विधान _________ या नावाने ओळखले जाते.

(1) सातत्य समीकरण
(2) बर्नोलीचे समीकरण
(3) पास्कलचा नियम
(4) युलरचे समीकरण

$\frac{p}{\rho} + hg + \frac{1}{2} =$ constant is the mathematical statement of

(1) Equation of continuity
(2) Bernoulli's equation
(3) Pascal's law
(4) Euler's equation



Adda247 मराठी

**39.** जेंव्हा $\alpha$-कण किरणोत्सारी घटकातून बाहेर पडतात तेंव्हा

(1) अणुअंक 2 ने कमी होतो आणि अणुवस्तुमाणांक 4 ने कमी होतो

(2) अणुअंक 1 ने कमी होतो आणि अणुवस्तुमाणांक 2 ने कमी होतो

(3) अणुअंक 1 ने वाढतो

(4) अणुअंक आणि अणुवस्तुमाणांक बदलत नाही

When $\alpha$-particle emits from a radioactive element then

(1) atomic number decreases by 2 and mass number decreases by 4

(2) atomic number decreases by 1 and mass number decreases by 2

(3) atomic number increases by 1

(4) atomic number and mass number remains same

---

**40.** मुलाचा ताप 104°F आहे. हे तापमान किती डिग्री सेल्सियस आहे ?

(1) 35° सेल्सियस (2) 37° सेल्सियस (3) 39° सेल्सियस (4) 40° सेल्सियस

The fever of a child is 104°F. What is this temperature in degree Celsius ?

(1) 35°C (2) 37°C (3) 39°C (4) 40°C

---

**41.** खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) ग्रहांचा वेग सूर्यापासून जास्तीत जास्त अंतर असताना सर्वात कमी आणि सूर्यापासून कमीत कमी अंतर असताना सर्वात जास्त असतो.

(2) ग्रहांचा वेग सूर्यापासून जास्तीत जास्त अंतर असताना सर्वात जास्त आणि सूर्यापासून कमीत कमी अंतर असताना सर्वात कमी असतो.

(3) ग्रहांचा वेग सूर्यापासून जास्तीत जास्त व कमीत कमी अंतर असताना सारखाच असतो.

(4) ग्रहांचा वेग सूर्यापासून जास्तीत जास्त व कमीत कमी अंतर असताना सर्वात जास्त असतो.

Which of the following statement is correct ?

(1) The speed of Planet is faster when they are nearer to the sun and slower when they are farther away from the sun.

(2) The speed of Planet is faster when they are farther from the sun and slower when they are nearer to the sun.

(3) The speed of Planet is same when they are nearer to the sun or farther away from the sun.

(4) The speed of Planet is faster when they are nearer to the sun or farther away from the sun.

---



Adda247

**42.** खालील जोड्या जुळवा – जीवनसत्वे व त्यांच्या अभावी होणारे रोग :

| | **जीवनसत्वे** | | **अभावाचे रोग** |
|---|---|---|---|
| अ. | अ जीवनसत्व | i. | मुडदूस |
| ब. | ड जीवनसत्व | ii. | स्कर्व्ही |
| क. | क जीवनसत्व | iii. | रक्तक्षय |
| ड. | बी$_{12}$ जीवनसत्व | iv. | रातआंधळेपणा |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | ii | iv | i |
| (2) | iv | i | ii | iii |
| (3) | i | iv | iii | ii |
| (4) | ii | iii | iv | i |

Match the following – Vitamins and respective deficiency diseases :

| | **Vitamins** | | **Deficiency disease** |
|---|---|---|---|
| a. | Vit. A | i. | Rickets |
| b. | Vit. D | ii. | Scurvy |
| c. | Vit. C | iii. | Anaemia |
| d. | Vit. $B_{12}$ | iv. | Night blindness |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | ii | iv | i |
| (2) | iv | i | ii | iii |
| (3) | i | iv | iii | ii |
| (4) | ii | iii | iv | i |

